# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, सातारा

**Office of the Collector and District Election Officer, Satara**

शिवाजी कॉलेज जवळ, जिल्हा कोषागार कार्यालयासमोर निवडणूक शाखा, सदरबझार, सातारा, ता.जि.सातारा.
दूरध्वनी क्रमांक — ०२१६२-२२९६०५; फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०३१०; E-mail : dydeosatara@gmail.com


जा.क्र.निवडणूक/कावि- ९२४६ /२०१७ दिनांक : ५ /०८/२०१७

## प्रेसनोट

**विषय:-** **मतदार यादीमध्ये वंचित मतदांरांची नोदणी करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र असना-या १८ ते २१ वर्षे वयोगटातील तरूणाची नोंदणीकरण्याची विशेष मोहिम दि. ३१/०८/२०१७ पर्यत मोहिम पुढे चालु ठेवणेबाबत**

**संदर्भ:-** **मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य याचेकडील पत्र क्र. ईएलआर-२०१७/प्र.क्र.३४८/१७/३३ दि. ०१ ऑगस्ट २०१७**

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निदेशा नुसार निरंतर पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत मतदार यादीमध्ये वंचित मतदांरांची नोदणी करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र असना-या १८ ते २१ वर्षे वयोगटातील तरूणाची नोंदणीकरण्याची विशेष मोहिम दि. ३१/०८/२०१७ पर्यत पुढे चालु ठेवणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

मा. आयोगाने निर्धारीत करून दिलेली उद्दिष्टे विशेषत: युवा मतदाराच्या नोंद्णीची उद्दिष्टे गाठणेसाठी यापुढेही काम करणे आवश्यक असलेचे दिसुन आले आहे. तसेच महाविद्यालये उशीरा सुरू झाली असलेने तरूण मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणेसाठी महाविद्यालयाकडून अद्याप अर्ज प्राप्त झालेले नसलेमुळे सदरचे अर्ज प्राप्त करून घेवून नोंदणी बाबतची कार्यवाही देखील पुर्ण करणे आवश्यक आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या **no voter to be left behind** या घोषवाक्यानुसार प्रत्येक मतदाराची मतदार यादीमध्ये नोंदणी करणेचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. म्हणूनच दि. ३१/०८/२०१७ पर्यत विशेष मोहिम पुढे चालु ठेवणेत येत आहे. याचा लाभ सर्व नवीन पात्र मतदारानी घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी हे करीत आहेत.

**जिल्हाधिकारी व जिल्हा**
**निवडणूक अधिकारी सातारा**

**प्रति,**
**जिल्हा माहिती अधिकारी सातारा**